2 - APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास लाखाचा निधी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शहाजी महाविद्यालयाचे निवृत्त प्रा. के. एम. मोरे व कुंदा मोरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांचा निधी शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी हा धनादेश स्वीकारला.

प्रा. मोरे यांनी दिलेल्या रकमेच्या व्याजातून एम. ए. राज्यशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात यावे, अशी इच्छा प्रा. मोरे यांनी व्यक्त केली.

प्रा. मोरे मूळचे उरूण-इस्लामपूर येथील असून त्यांचे वडील महादेव आबाजी मोरे व आई तानुबाई महादेव मोरे या अशिक्षित होत्या. तरीही त्यांनी आपल्या कुटुंबातील मुलांबरोबरच गावातील अन्य मुलांनाही शिक्षण घेण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या या शिक्षणविषयक तळमळीच्या स्मृती चिरंतन राखण्यासाठी शिवाजी विद्यापीठास देणगीदाखल निधी देण्याचा निर्णय घेतल्याचे प्रा. मोरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी इंग्रजी अधिविभागाचे प्रा. एम. एल. जाधव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.



**कोल्हापूर : एक लाख रुपयांचा निधी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना के. एम. मोरे.**

2 - APR 2017 लोकमत

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने राज्य युवा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या श्वेता परुळेकर आणि प्रियांका पाटील यांचा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

# कुलगुरूंच्या हस्ते परुळेकर, पाटील यांचा विशेष गौरव

**कोल्हापूर :** राज्य युवा पुरस्कारांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकाच वेळी दोन विद्यार्थिनींची निवड होणे, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने राज्य युवा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या श्वेता परुळेकर आणि प्रियांका पाटील या विद्यार्थिनींचा शनिवारी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, युवकांच्या तुलनेत युवती कोठेही तसूभरही कमी नाहीत, हे या विद्यार्थिनींनी दाखवून देत युवा पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे. त्यांची ही कामगिरी विद्यापीठातील अन्य विद्यार्थिनींसाठीही आदर्शवत अशा प्रकारची आहे.

यावेळी कुलगुरूंच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

2 - APR 2017

लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

## ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने परीक्षा, सुमारे १५० अभ्यासक्रमांसाठी परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा ५ मेपासून सुरु होणार असून, ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतींनी ही परीक्षा होईल. यासाठी शनिवारपासून परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. याबाबत सविस्तर माहिती https.\\onlineshivajiuniversity.in,www.unishivaji.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे.



नव्या शैक्षणिक वर्षाच्या (२०१७-१८) विविध सुमारे १५० अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चितीसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. ऑफलाईन परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठ, सायबर (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा), संत गाडगेबाबा महाविद्यालय (कऱ्हाड), कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स (सांगली), तर ऑनलाईन परीक्षांसाठी कोल्हापुरातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, केआयटी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूरमधील जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारामधील के. बी. पी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक कँप, यशोदा टेक्निकल कॅम्पस, अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, तर सांगली जिल्ह्यातील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे), अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (आष्टा), अंबाबाई तालीम संस्थेचे संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स (सांगली-मिरज हायवे) ही केंद्रे आहेत.

### अशी होणार परीक्षा...

**ऑफलाईन**

- दि. ५ मे : एम.ए. / एम. एस्सी. भूगोल, मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. केमिस्ट्री, बी. जे. सी, एम. जे. सी, एम. एस्सी. अॅग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, एम. ए. प्रवेश परीक्षा अन्य शाखांसाठी.
- दि. ६ मे : बी. लिब. सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. लिब. सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. एस्सी. मायक्रोबायॉलॉजी, एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रोबायॉलॉजी, एम. एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम. एस्सी. भूगर्भशास्त्र, एम. एस्सी. फिजिक्स, दूरशिक्षण केंद्र- एम. बी. ए. (एक्झिक्युटिव्ह) अँड एम. बी. ए., एम. एस्सी स्टॅटिस्टिक्स, एम. एस्सी. अॅप्लाईड स्टॅटिस्टिक्स अँड इन्फर्मेटिक्स.
- दि. ७ मे : एम. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम. एस. डब्ल्यू. (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, एम. आर. एस. (मास्टर ऑफ रुरल स्टडीज), एम. बी. ए. (रुरल मॅनेजमेंट), एम. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी).

**ऑनलाईन**

- दि. ८ मे : एम. एस्सी. बॉटनी, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्सेस, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स.
- दि. ९ मे : एम. एस्सी. प्राणिशास्त्र, एम. एस्सी. बायोटेक्नॉलॉजी/बायोकेमिस्ट्री/एन्व्हार्न्मेंटल बायोटेक्नॉलॉजी, एम. एस्सी. एन्व्हार्न्मेंटल सायन्स, एम. एस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी.

2 - APR 2017 सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश

## प्रवेश प्रक्रिया : ऑनलाइन, ऑफलाइनसाठी वेगवेगळी केंद्रे

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी प्रक्रिया सुरू झाली असून, परीक्षेचे अर्ज ऑनलाइन भरता येणार आहेत.

ऑफलाइन परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा), संत गाडगेबाबा महाविद्यालय (कऱ्हाड), कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स (सांगली), तर ऑनलाइन परीक्षांसाठी कोल्हापुरातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, केआयटी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूरमधील जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारामधील के. बी. पी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक कँप, यशोदा टेक्निकल कँपस, अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, तर सांगली जिल्ह्यातील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे), अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (आष्टा), अंबाबाई तालीम संस्थेचे संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस (सांगली-मिरज हायवे) ही केंद्रे आहेत.

### ऑनलाइन

- ८ मे : एम.एस्सी. बॉटनी, कॉम्प्युटर सायन्सेस, इलेक्ट्रॉनिक्स
- ९ मे : एम. एस्सी. प्राणीशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी/ बायोकेमिस्ट्री/एन्व्हायर्मेंटल बायोटेक्नॉलॉजी, एन्व्हायर्मेंटल सायन्स, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी.

**प्रवेश परीक्षेसाठी शुल्क असे (रुपयांत):**

- १५ एप्रिल - २०० • २० एप्रिल - ३०० • २५ एप्रिल - ८००



**ऑफलाइन -**

५ मे : एम.ए./एम.एस्सी. भूगोल, मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. केमिस्ट्री, बी.जे.सी, एम.जे.सी, एम. एस्सी. अँग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, एम. ए. प्रवेश परीक्षा अन्य शाखांसाठी.

- ६ मे : बी. लिब. सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. लिब सायन्स अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. एस्सी. मायक्रोबॉयोलॉजी, एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रोबायोलॉजी, एम. एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम. एस्सी. भूगर्भशास्त्र, एम. एस्सी. फिजिक्स, दूरशिक्षण केंद्र - एम. बी. ए. (एक्झिक्युटिव्ह) अँड एम. बी. ए. एम. एस्सी स्टॅटिस्टिक्स, एम. एस्सी. ॲप्लाईड स्टॅटिस्टिक्स अँड इन्फर्मेटिक्स.

७ मे : एम. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम. एस. डब्ल्यू. (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, एम. आर. एस. (मास्टर ऑफ रुरल स्टडिज), एम. बी. ए. (रुरल मॅनेजमेंट), एम. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी).

2 - APR 2017 पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या पदव्युत्तर परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील नवे शैक्षणिक वर्ष (२०१७-१८) साठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागाने शनिवारी जाहीर केले. आजपासून या प्रक्रियेस सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठाच्या या www.unishivaji.ac.in अधिकृत संकेतस्थळावर याबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांनी पहावी, असे आवाहन परीक्षा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

२०१७-१८ या वर्षाच्या नव्या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती करण्यासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. जवळपास दीडशेच्या आसपास अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेतल्या जाणार आहेत. आजपासून या प्रक्रियेस सुरुवात झाली. १० एप्रिलपासून ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार आहे. प्रवेश परीक्षा ५ मेपासून सुरू होणार आहे. एमए, एमएस्सी, एम.ए. मास कम्युनिकेशन



- प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू
- अर्ज ऑनलाईन पद्धतीने
- ५ मेपासून प्रवेश परीक्षा सुरू
- १० एप्रिलपासून अर्ज

आदी विविध अभ्यासक्रमांच्या ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा ५ मे रोजी असणार आहे. यासह विविध अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**प्रवेश परीक्षांची ऑफलाईन केंद्र**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँन्ड रिसर्च (सायबर), **सांगली :** कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड सायन्स, **सातारा :** यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, संत गाडगेबाबा महाविद्यालय, कराड.

**ऑनलाईन केंद्र : कोल्हापूर :** डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स, शिवाजी विद्यापीठ, केआयटी कॉलेज, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कसबा बावडा, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, चित्रनगरी, जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर, **सांगली :** राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा, श्री अंबाबाई तालीम संस्थेचे संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स. **सातारा :** के.बी. पी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड पॉलिटेक्निक कॅम्प, यशोधा टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग, अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 - APR 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या २०१७ या शैक्षणिक वर्षातील सर्वच अधिविभागाची प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून सुरू झाली आहे. विविध विभागाची प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या **www.unishivaji. ac in.** या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या संकेतस्थळावर प्रत्येक विभागाचे प्रवेश शुल्क, प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, प्रवेश प्रक्रिया पद्धत आदीची सविस्तर माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेचे शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेच्या माध्यमातून भरावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

2 - APR 2017 Times of India
जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK declares entrance exam details

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) on Saturday declared details of the upcoming entrance examination for 30 courses — seven online and 23 offline exams.

The SUK has invited applications from the interested candidates up to April 15 for which Rs 200 fee will be charged per subject as fee for entrance exam, while applicants submitting forms after April 15 and till April 20 will have to pay Rs 300. Those applying after that till April 25, will have to pay Rs 800.

According to the university circular, the entrance exam forms have been made available at the varsity's website, unishivaji.ac.in, from April 1. A separate admission 2017 link has been provided on the website giving details about the available courses.

The first phase of entrance exam through offline mode will be conducted on May 5, 6 and 7, while the online entrance will be conducted on May 8 and 9 at the designated exam centres.

The varsity has, however, not issued details of the examination centres for any of the online or offline examination. The circular read: "On May 8, the online entrance examination for MSc Botany, MSc Computer Science and MSc Electronics will be conducted, while on May 9 the entrance test will be conducted for the PG courses in MSc in Zoology, Biotech, Biochemistry, Environmental Science, Food Science and technology and Environmental Biotechnology."

About the offline examinations, the circular read that courses such as MA Mass Communication, MSc Chemistry, MSc agrochemicals and pest management and MSc Geography will be conducted on May 5.

"For B Library Science and Information Science, M Lib Science and Information Science, MSc microbiology, MSc pharmaceutical microbiology, MSc mathematics, MSc Geology, MSc Physics, MSc statistics, among others, the entrance exam will be conducted on May 6," the circular said.

The exam for the courses such as Master of Rural Studies, MSc Sugar technology, MSW (Rural community development), MSc alcohol technology etc., will be conducted on May 7 via offline mode.

"The varsity with 40 different departmental courses conducts entrance examination for over 25 PG courses every year. All the other courses fall in the social sciences, languages and political sciences category and do not require entrance exam. There are many such courses which students can opt for postgraduate degree and diploma level," as SUK official said.

2 - APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. प्रवेशासाठी आवश्यक प्रवेश प्रक्रियेचे अर्ज आणि परीक्षा फी विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने भरू शकणार आहेत.

विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या www. unishivaji.ac.in या संकेतस्थळावर प्रवेशासंबंधी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरील प्रवेश २०१७ या लिंकला भेट देणे आवश्यक आहे. या लिंकद्वारे शिवाजी विद्यापीठातील विविध कोर्सेस, या कोर्सेससाठी आवश्यक अर्हता, प्रवेश प्रक्रिया, प्रवेश परीक्षा, त्याचे स्वरूप, प्रवेश प्रक्रिया शुल्क तसेच ते जमा करण्याची पद्धत, प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षेचे ठिकाण यांची माहिती देण्यात आली आहे. प्रवेश शुल्क जमा करण्यासाठी ऑनलाईन पेमंट गेट वे पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

2 - APR 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# समाज शिक्षक

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांचा पंच्याहत्तरीनिमित्त आज (२ एप्रिल) मिरजेतील पटवर्धन हॉल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ) येथे सकाळी १० वाजता सत्कार होत आहे. यानिमित्त त्यांच्या 'व्यक्ती, विचार व अर्थ', 'नोटाबंदी : काही निबंध', 'प्रश्न पाण्याचा', 'कॉन्फ्रंटिंग पॉवर्टी' या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. त्या निमित्त...

**विजय चोरमारे**

शिक्षकाने समाज शिक्षकाची भूमिका बजावायला हवी, असे सातत्याने बोलले आणि लिहिले जाते. परंतु अशी भूमिका बजावणारे खूप कमी शिक्षक असतात. प्रा. डॉ. जे. एफ. पाटील हे अशा पंथातले एक महत्त्वाचे नाव. सामान्यांना समजायला कठीण असलेला अर्थशास्त्रासारखा विषय सोप्या पद्धतीने समजून सांगण्याचे व्रत त्यांनी निष्ठेने जोपासले. विद्यार्थी, सहकारी शिक्षक, संघटनेतील सहकारी, विद्यापीठाच्या अधिकार मंडळातील सहकारी, शिक्षण संस्थाचालक, प्रसारमाध्यमांमध्ये काम करणारे लोक अशा अनेक घटकांना त्यांच्याविषयी आत्मीयता वाटते आणि त्यांना ते फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइड वाटतात. विशीच्या उंबरठ्यावरचे विद्यार्थी असोत किंवा पैलतीरी डोळे लागलेले बुजुर्ग असोत. सगळ्यांशी ते अगदी सहजपणे मित्रत्वाचे नाते जोडू शकतात. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक लोकांनी त्याचा अनुभव घेतला आहे.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची पहिली ओळख आहे. त्यांच्या पुढच्या कार्याचा विस्तारही त्याच माध्यमातून झाला आहे. त्यामुळे त्यांची मूळ ओळख अधिक महत्त्वाची आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाला विद्यापीठातील वजनदार विभाग म्हणून ओळख मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. अर्थशास्त्र विभागातील अनेक प्राध्यापकांनी समाजाच्या अनेक क्षेत्रांत सहकार्याचा हात दिला आहे. त्याची सुरुवात डॉ. जे. एफ. पाटील यांच्यापासूनच झालेली पाहावयास मिळते. विद्यापीठ आणि समाजात एक अदृश्य भिंत उभी असते, ती नेस्तनाबूत करून विद्यापीठ समाजाभिमुख करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या काळातच विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपक्रम घेतले. त्यानिमित्त अनेक तज्ज्ञ विद्यापीठात येऊन गेले. देशाचे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना विद्यापीठात निमंत्रित करण्यामध्येही त्यांचा मोठा सहभाग होता. वेगवेगळ्या निमित्ताने देशभरातील अनेक अर्थशास्त्रज्ञांना त्यांनी शिवाजी विद्यापीठात आणले. उत्तम चर्चा घडवून आणल्या. आपल्या विद्यार्थ्यांना त्या माध्यमातून चांगले संस्कार देण्याचा प्रयत्न केला.



विद्यार्थीप्रिय प्राध्यापक ही संकल्पना आपल्याकडे खूप सवंगपणे वापरली जाते. विद्यार्थीप्रिय म्हणजे विद्यार्थ्यांना आवडणारे, असे ढोबळमानाने म्हणता येईल. परंतु डॉ. जे. एफ. पाटील हे विद्यार्थ्यांसाठी सहकार्याचा हात सतत पुढे असलेले प्राध्यापक होत. स्वत: कधीच काही न लिहिणारे अनेक आळशी प्राध्यापक विद्यार्थ्यांकडून काम करून घेऊन त्यांच्या जोडीला स्वत:चे नाव जोडून चर्चासत्रे, परिसंवादातून मिरवत असतात. डॉ. पाटील स्वत: सतत इतके लिहीत असतात की, त्यांना असे काही करण्याची गरज नाही. परंतु आपल्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून ते अगदी ज्युनिअर सहायकासोबत लेखन करतात. त्या नव्या संशोधकाला वाट दाखवणे, त्याचे नाव प्रस्थापित करणे या हेतूने ते काम करीत असतात. त्याचमुळे आज अर्थशास्त्रामध्ये त्यांनी उभी केलेली अनेक नावे ठळकपणे दिसतात आणि ती मंडळी सातत्याने लिहीत असतात.

पचवीस वर्षांपूर्वी डॉ. पाटील आणि त्यांचे सहकारी डॉ. व्ही. बी. ककडे अर्थसंकल्पादिवशी विश्लेषणात्मक लेखन करायचे. त्यावेळी इंटरनेटची सुविधा नव्हती किंवा टीव्हीवर प्रक्षेपण नसायचे. पीटीआयमार्फत बातम्या यायच्या. दोघेजण पीटीआयच्या कार्यालयात बसून अर्थसंकल्पाचे विश्लेषण करायचे. अनेक वर्षे हा उपक्रम सुरू होता. आजही त्यांच्या लेखनात खंड पडलेला नाही. वय वाढत गेले, जबाबदाऱ्या वाढत गेल्या, पदे वाढत गेली, तरी त्यांनी आपली समाज शिक्षकाची भूमिका कधी सोडली नाही किंवा कारणे सांगून त्यापासून बाजूला झाले नाहीत. ही केवळ आपलीच जबाबदारी आहे असे मानून त्यांनी ते काम निष्ठेने सुरू ठेवले आहे. आपल्या विषयावरची अशी निष्ठा खूप कमी माणसांकडे दिसून येते. आजच्या काळात तर ती दुर्मिळ झाली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू होण्याचे त्यांचे स्वप्न होते आणि त्यांनी ते कधी लपवून ठेवले नाही. परंतु कुलगुरू होण्यासाठी केवळ विद्वत्ता आणि प्रशासन कौशल्य हे दोन गुण पुरेसे ठरत नाहीत. त्यासाठी अनेक गोष्टींची जोड लागते. डॉ. पाटील यांच्याकडे कुलगुरूपदासाठीचे दोन मूलभूत गुण होते; परंतु पूरक अटींमध्ये ते सतत मागे पडत राहिले. शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळाचे संचालकपद त्यांनी भूषविलेले सर्वोच्च पद होते.

**(डॉ. सिंधुदेवी कोरे-निकम व कमल पाटील यांनी संपादित व प्रकाशित केलेल्या 'जे.एफ.सर' या पुस्तकातून साभार.)**

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 - APR 2017
लोकमत

# अभ्यासासाठी जगन कराडे सिमल्यास रवाना

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे हे असोसिएट फेलोशिपचे अंतिम सत्र पूर्ण करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडी (आयआयएएस) या सिमला येथील प्रतिष्ठित संस्थेकडे शुक्रवारी (दि. ३१) रवाना झाले. या फेलोशिपअंतर्गत डॉ. कराडे यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील तज्ज्ञांसोबत चर्चा करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

# इंग्रजी अधिविभाग प्रमुखपदी अत्तार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



इंग्रजी अधिविभागातील ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. पी. ए. अत्तार यांची विभाग प्रमुखपदी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नियुक्ती केली.

प्रा. अत्तार हे शिवाजी विद्यापीठाचे इंग्रजी विभागाचे सुवर्णपदक विजेते विद्यार्थी असून, त्यांना यूजीसी व भारत सरकारतर्फे संशोधनासाठी फेलोशिप देण्यात आली होती. यापूर्वी त्यांनी वेणुताई चव्हाण कॉलेज, कऱ्हाड या ठिकाणी, तसेच माळवाडी-कोतोली येथे प्राचार्यपदावर काम केले आहे. इंग्रजी विभागाचे विभागप्रमुख म्हणून २००८-१४ या कालावधीमध्ये काम केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी २० पीएच. डी. व १७ एम. फिल. पदवी प्राप्त केल्या आहे. त्यांनी २० पुस्तकांचे सहसंपादन केले आहे. नुकतेच 'ब्रिटिशराज नॉव्हेल्स' हे पुस्तक अमेरिकेतून प्रसिद्ध झाले आहे.

12 - APR 2011 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रणजित शिंदे यांची सिनेटर म्हणून निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** सहायक अधीक्षक रणजित शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर शिक्षकेतर प्रवर्गातून सिनेटर म्हणून निवड झाली. त्यांना निवडीचे पत्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. टी शिर्के, बी. सी. यू. डी.चे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.